भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
स्थापना १९८१

# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ८ वे** | **ऑक्टोबर, २०१२** | **अंक ३ रा**

**श्री. आनंद पराडकर, अध्यक्ष** | **श्री. गोपाळ भाटवडेकर, सचिव** | **श्री. चंद्रशेखर जोशी, कोषाध्यक्ष**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ९६५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
९९७०१७४८१८

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२-२५२४२७०६
श्री. चंद्रकांत जोशी, बेळगांव : ०८३१-२४३१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई : ९७६९३२९९९३
सौ. सुषमा करकरे, ठाणे : ०२२-२५३६८७२४
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७-२६०१४५७
प्रा. शिरीष दिलीप फडणीस, सातारा : ९८९००४००२६
श्री. मधुसूदन वा. देसाई, रत्नागिरी : ०२३५२-२२३४४१
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ९२२७१३५७९४

**इतर संघांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**

# आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) (२०१२-१३ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, मनिऑर्डर, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५१०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्त्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी सौ. सुषमा करकरे, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**- श्री. हेमकिरण बाक्रे**

**नियतकालिकाचे नाव** : 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


५ कन्या पतीची बारा संसार चित्रे

९ यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा?

१३ पवित्र अन् रमणीय – बद्रीकेदार

१५ सद्‌गुरु

१६ मंदिरात देवासमोर कासव कां?

१७ शरीर व मनाला संतुलित ठेवणारे अथर्वशीर्ष

१९ कविकुलगुरु कालिदास

१९ मन

२१ कऱ्हाडे ब्राह्मण संघ निमंत्रण पत्रिका

२२ संस्थावृत्त

२३ संस्थावृत्त

२४ कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा वर्धापनदिन साजरा



'संपर्क' हे नियतकालिक भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने ज्ञाती बांधवांसाठी एकवीरा प्रकाशन व प्रसिद्धीसेवा, कर्वेनगर येथे छापून, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, 'अनिश प्रासाद', ४३७, नारायण पेठ येथे प्रसिद्ध केले.

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**– संपादक**

संपर्क



# संपादकीय

मागील अंकात आवाहन केल्याप्रमाणे प्रतिसाद उत्तम मिळाला. ठाणे, बडोद्याहून काही वर्गणीदार मिळाले तर बेळगांव, मुंबईहून लेख, प्रवासवर्णन मिळाले. आणि कोल्हापूरहून कविता मिळाल्या. म्हणजे याचाच अर्थ आपल्या छोट्याशा समाजात हळूहळू जागृती होत आहे. खरेच, खूप आनंद झाला. पुण्याहूनही काही वर्गणीदार मिळाले व एका सभासदांने शेरोशायरीचे सदर सुरु करण्यात रस दाखवला आहे. थेंबे थेंबे तळे साचे, या न्यायाने आपण तळेच काय, विशाल सागर निर्माण करु अशी ग्वाही तुम्ही दिलेली आहे व विश्वास द्विगुणीत झाला आहे. असाच प्रतिसाद यापुढेही सर्वांगाने मिळत राहील याची खात्री वाटते.

माझा मुलत: विचार असा होता की, आपण एखादा विषय मांडावाच त्यातून चर्चा करावी. परंतु नंतर असे लक्षात आले की, हे त्रैमासिक असल्यामुळे कदाचित एखादा विषय पुढील अंकापर्यंत शिळा होईल.  आज जगांत एवढ्या गोष्टी घडत असतात की, आत्ताची बातमी कांही वेळांत शिळी होण्याचा धोका असतो. व म्हणूनच की काय ब्रेकींग न्युज पुर्णत: तुटून मोडून गेली असली तरी चॅनेलवाले त्याचा पिच्छा सोडावयास तयार नाहीत.

हल्ली जागतिकीकरणामुळे एका अर्थाने जग जवळ आले आहे. असे वाटते, पण त्याच वेळेस आपली नीतिमत्ता, संस्कृती लयास जायला लागली आहे कां? अशी शंका मनात आल्याशिवाय रहात नाही. सर्व गोष्टींचा अतिरेक हा आपला स्थायीभाव तर बनून जाणार नाही ना? अशी एक अनामिक भीती मनांत दाटून येत आहे.

उदाहरणादाखल आपण भारतातील सद्यस्थितीतील राजकीय व्यवस्था पाहू. लोकप्रतिनिधींची समाजाशी असलेली नाळ तुटत चालली आहे. किंबहुना पुर्णता: तुटली आहे असे नाही कां आपल्याला वाटत? सध्या राजकारणाचा जो खेळखंडोबा चालला आहे, त्याला आपणही जबाबदार आहोत असे मनाच्या कुठल्याही लहानशा कोपऱ्यात नाही का जाणवत? राजकीय पक्ष देशाची पर्वा न करता जेंव्हा मते, पक्ष व स्वत: यांचाच विचार करतात, तेंव्हा तळपायाची आग मस्तकांत नाही का जात?

आपण सर्वजण या निर्माण केलेल्या व्यवस्थेला दोष देऊन मोकळे होतो व फक्त चर्चा / बोलणे यापलीकडे आपण जात नाही! का बरे? लोकशाहीने आपल्या हातात एवढी शक्ती दिली आहे, त्याचा विचारही करावयास आपण तयार नाही. पण कां? कुठेतरी जबर भीती आहे. सांगता येत नाही असे दडपण आहे, हे खरेच नां?

आपल्या भारतात राष्ट्रभक्तीचा अभाव आहे, हे आपण मानता की नाही, पण मला हे तीव्रतेने जाणवते. आपण हताश झालो आहोत. हतबल झालो आहोत. आपण सध्याच्या व्यवस्थेपुढे शरणागती पत्करली आहे.

असे मला वाटायचे कारणही सांगतो. गेले दिड वर्ष श्री. अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनानी आपल्या देशभर एकप्रकारच्या क्रांतीचा भास झाला. अण्णांच्या रुपात आपल्यापैकी अनेक जणांनी एक निष्काम, निर्मळ नेतृत्व पाहिले. बऱ्याचजणांनी हिरीरीने पाठिंबा दिला. मी अण्णा अशा टोप्या घालून मिरवावयास काही कमी केले नाही. पण या आंदोलनाचे फलीत काय मिळाले? आज टीम अण्णांमध्ये फुट पाडून राजकीय नेतृत्व पुनश्च दिमाखाने वावरत आहे.

या सर्वांसही आपणच जबाबदार आहोत असे नाही वाटत तुम्हांला?  हो आपणच जबाबदार आहोत. कारण आपल्यांत आत्मविश्वास राहिला नाही. दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिण्यांची सवय आपल्याला लागली आहे. आपण सुखवस्तु प्रेमी झालो. जे काही करायचे ते दुसऱ्यानी करावे व त्याची फळे मात्र आपल्याला मिळावीत असे आपणांस वाटायला लागले आहे. हा स्वार्थी विचार योग्य आहे कां? आपणही काही हालचाल करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराविरुध्द पहिले पाऊल आपण उचलले पाहिजे. आपल्या आयुष्यांत आपण कधीच भ्रष्टचार करणार नाही असे ठामपणे ठरविण्यांची वेळ आली आहे व असे आपण ठरविले तर करु शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बेळगांवचे श्री. सुरेश हुंदरे. त्यांच्यासारखा व्यावसायिक हे करु शकतो तर आपण कां नाही याचा विचार आपण करायला हवा असे मला वाटते.

तुमच्या हातात अंक पडेपर्यंत गणेश उत्सव निर्विघ्नपणे पार पडला असेलच व आपण आता दसरा दिवाळीच्या तयारीला लागले असू.

''संपर्क'' परिवारातर्फे आपल्याला दसरा दिवाळीच्या शुभेच्छा !

आपल्या मैत्रीस ओलावा निर्माण करण्यांसाठी आपण सुरवात तर छानच केली आहे. पण आळस झटकून आपण आपल्या मैत्रीचे रोपटे लवकरच मोठे होईल असा विश्वास एकमेकांत निर्माण करण्यांत यशस्वी होऊ असा मला ठाम विश्वास वाटतो.

धन्यवाद!

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

An Aesthetic Essence To Advertising

Domination in

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता
हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम.
आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# कन्या पतीची बारा संसार चित्रे

**विलास गोपाळ देव**




**कन्या व मकर ही पती-पत्नीची जोडी ज्योतिषीय भाषेत नवपंचम या अत्यंत शुभयोगातील. दोन्ही राशी पृथ्वीतत्त्वाच्या. कन्या ही द्विस्वभाव तर मकर ही चर स्वभावाची रास हाच काय तो फरक. तसे दोघांचे राशीस्वामी अनुक्रमे बुध व शनि हे एकमेकांचे मित्रच. दोन्ही राशी स्त्रीराशी असल्या तरीसुध्दा कन्या बौध्दिक बाजू सरस असलेली पण सहनशीलता कमी. शारिरीक कष्टाची तयारी नसलेली उलट मकर बौध्दिक बाबतीत थोडी लंगडी असली तरी सहनशक्तीत बारा राशीत नंबर एकवर असलेली.**

कन्या पतीला वृश्चिक राशीची पत्नी मिळणे म्हणजे एक प्रकारे जुने हिशोब चुकते करण्यासाठी एकत्र आलेले जोडपे. त्यातही गंमत म्हणजे तुमची कन्या रास निसर्गकुंडलीत षष्ठात म्हणजे रोगस्थानी येते तर पत्नीची वृश्चिक रास अष्टम म्हणजे मृत्युस्थानी येते. अर्थात तशा या दोन राशी एकमेकांपासून तिसऱ्या-अकराव्या म्हणजे त्रिरेकादश योगातल्या. दोन्ही ही स्त्री राशी, मात्र एक पृथ्वीतत्त्वाची तर एक जलतत्त्वाची, एक द्विस्वभाव तर दुसरी स्थिर, एक बुधाची तर दुसरी मंगळाची म्हणजे स्त्रीत्व सोडून दोन्हीत समानत्व नाही. त्यात बुध-मंगळ, पृथ्वी-जल सर्वच परस्पर विरोधी. तुम्ही संशयी तर पत्नी पाताळयंत्री, तुम्ही शंकासुर तर पत्नी कटकारस्थानी. तुम्ही चतुरस्त्र बुध्दीमान कोटीबाज तर पत्नी थोडीशी आक्रमक, स्पष्टवक्ती, एक घाव दोन तुकडे करणारी. तसे दोघेही झाकून ठेवण्यात हुशार पण तुम्ही एखादी गोष्ट, माहिती निर्हेतुक झाकून ठेवता तर पत्नी हेतुपूर्वक दडवून ठेवते. तुम्ही सौम्य स्वभावाचे, पत्नी जहाल स्वभावाची. तुमच्या बोलण्यात टीका जरूर पण तुम्ही विनोदाच्या सहाय्याने दुसऱ्याचे दोष दाखविणार तर पत्नी टोचून बोलणार, वाग्बाणांने घायाळ करणार. स्त्री असून पुरूषासारखी हुकुमत गाजवण्याची आवड, भडक रंगांची, सजावटीची आवड, धाडस-साहस यांची आवड, नाजूक, कोमल भावनांचा अभाव. या सर्वांमुळे घरामध्ये वादावादी किंवा वादळापूर्वीची किंवा नंतरची शांतता, तीसुध्दा असह्य होणारी. मेष पत्नीशी मृत्युषडाष्टक, तसे वृश्चिक पत्नीशी नाही. पण बाकी बरेचसे तसेच संसारचित्र. तुमचा विनोद समजण्याएवढी विनोदबुध्दी तिच्याजवळ नाही आणि तिचा पराक्रम मानण्याएवढा मनाचा मोठेपणा तुमच्याजवळ नाही. तुम्ही त्या विंचवाच्या नांगीच्या फटक्यापासून जपून रहा, पत्नीला मोठेपणा द्या, तुमचा भित्रा स्वभाव सोडून धाडसी व्हा, बुध्दीची चमक दाखवा, तुमचा संसार अगदी अवघा आनंदी आनंद असा नाही तरी सुखावह नक्कीच होईल. दोघांनाही समजेल, ''मोहब्बत बडे काम की चीज है।''

कन्या पती आणि धनु पत्नी म्हणजे दोन द्विस्वभाव माणसांचे जोडपे. अर्थात स्त्री असली तरीही धनु राशीची पत्नी तुमच्यापेक्षा अधिक ठाम, पराक्रमी आणि कार्यक्षम असते. तसे तुमची रास वैश्यवर्णी तर पत्नीची रास क्षात्रधर्मी, तुम्ही राजस तर पत्नी सात्विक, पण बुध म्हणजे ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती तर गुरू म्हणजे ज्ञान, पांडित्य, विद्वत्ता. स्मरणशक्ती म्हणजे विद्वत्ता. ज्ञान मिळविण्यासाठी स्मरणशक्ती हवीच. त्यामुळे ज्योतिषात बुध-गुरू नैसर्गिक जोडीदार होतात. शिवाय बुध म्हणजे वाणी (वाचा) तर गुरूचा गूण शब्द (आकाशतत्त्वामुळे) वाणीला शब्दाचा आधार लागतो आणि वाणी आहे म्हणूनच शब्द संपत्ती तयार झाली. अर्थात बुध-गुरूच्या अधिपत्याखालील तुम्ही आणि तुमची पत्नी या दोघांना हे उमजेल तर परस्परपूरक भूमिका तुम्ही बजवाल. तसे तुम्हाला पत्ते, बुध्दिबळ, कॅरम असे बैठे खेळ प्रिय कोडी, आकडेमोड अशी बौध्दिक कसरत आवडते तर पत्नीला क्रिकेट, हॉकी, कबड्डी असे मैदानी खेळ प्रिय आणि दंड-बैठका अशी शारिरीक कसरत हवी. तशी पत्नीजवळ कोमल, नाजूक भावनांची वानवाच. वाचनाची तुमच्याइतकी नाही तरी थोडी आवड तिला असतेच. पण तुम्हाला छोट्या कथा, विनोदी चुटके प्रिय तर पत्नीला कादंबरी, चरित्रग्रंथ प्रिय. नैसर्गिकरीत्या संसाराचे चाक तिच्या हाती अधिक सुरक्षित असते. कारण नेतृत्वगुण तिच्या रक्तातच, वृत्तीतच असतो. मुलांनाही तिचा धाक अधिक. रंगसंगतीत तुम्हाला हिरवा-निळा आणि त्यातही त्यांच्या सौम्य छटा प्रिय तर पत्नीला केशरी पिवळा असे रंग व त्यांच्या थोड्याशा गडद छटा प्रिय. बाहेर जाऊन सरकारी कचेरीपासून कोणत्याही तक्रार निवारण केंद्रापर्यंत कामासाठी जाणे व काम यशस्वीपणे करणे यात तुमची पत्नी तुमच्यापेक्षा खूपच यशस्वी असते. तसा समाजातही तिला न मागता मान मिळतो, आदर मिळतो. तसा तुम्हीही तिला आदर द्या, सत्वगुणी धनु स्त्री धनुष्याला बासनात गुंडाळून तुमच्या बुध्दीचा मान राखेल. घरात आनंद नांदेल, दोघेही गाल, ''दिलकी नजरसे, नजरोंके दिल से, ये राज क्या है, ये बात क्या है, कोई हमे बता दे।''

कन्या व मकर ही पती-पत्नीची जोडी ज्योतिषीय भाषेत नवपंचम या अत्यंत शुभयोगातील, दोन्ही राशी पृथ्वीतत्त्वाच्या, कन्या ही द्विस्वभाव तर मकर ही चर स्वभावाची रास हाच काय तो फरक. तसे दोघांचे राशीस्वामी अनुक्रमे बुध व शनि हे एकमेकांचे मित्रच. दोन्ही राशी स्त्रीराशी असल्या तरीसुध्दा कन्या बौध्दिक


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९११००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

बाजू सरस असलेली पण सहनशीलता कमी, शारिरीक कष्टाची तयारी नसलेली उलट मकर बौध्दिक बाबतीत थोडी लंगडी असली तरी सहनशक्तीत बारा राशीत नंबर एकवर असलेली, शारिरीक कष्टांना पण अजिबात मागे पुढे न पाहणारी. त्यामुळे संसाराचा गाडा ओढण्यातील कष्टाची कामे आपोआपच मकर पत्नीकडे जातात. तशी तुमच्या सौम्य रंगांच्या आवडीला निळी-काळी किनार लावण्याचे काम मकर पत्नी चांगले करते. तशी तिला फारशी हौस मौज नसतेच त्यामुळे घराच्या रंगसंगतीपासून सजावटीपर्यंत तुमचाच निर्णय चालतो. तुमचे घर व्यवस्थित व स्वच्छ ठेवण्याचे काम पत्नी करतेच पण तुमचा संग्रह. मग तो पुस्तकांचा असो वा रिकाम्या बाटल्यांचा असो, योग्य प्रकारे सांभाळणे मकर पत्नीला जमते. तशी वृषभ पत्नी हे काम अधिक कलात्मक दृष्टीने करेल पण तुम्हाला ऐकवून दाखवित राहील. मकरेची पत्नी मूकपणे काम करील. क्वचितच निषेध नोंदवेल, तो सुध्दा कृतीने. तुमच्या घरातील ज्येष्ठांची सेवा करण्यात मकर पत्नीचा हात कोणी धरणार नाही पण त्यात कर्तव्यदक्षता अधिक असेल, मायेचा ओलावा कमी. तसे तुमच्या संततीला आई-वडील दोघेही व्यवहारदक्ष मिळतील पण माया मिळणे कठीणच. कामाचा झपाटा, निर्णयातील वेग सर्वच पत्नीकडे जास्त तितका वेग तुम्हाला गाठणे कठीणच. व्यवहारात ती पक्की तर एखाद्या गोष्टीचा कीस काढण्यात तुम्ही तज्ञ. तिच्या कष्टांची जाणीव ठेवा, तिला योग्य मान द्या, तिला तुमच्या बुध्दिमत्तेचा अभिमान असतोच, पण योग्य वागणूकीमुळे ती तुम्हाला आदर देईल, घरात आनंदाचे संगीत गुंजेल, थोडेसे गंभीर स्वभावाला अनुकूल असे गीत म्हणेल, ''तेरा मेरा प्यार अमर, फिर क्यों मुझको लगता है डर।''

कन्या-कुंभ ही पती-पत्नी जोडी पडष्टकातील. षडष्टकातील म्हणजे एक रास दुसरीपासून सहावी तर दुसऱ्या राशीपासून पहिली आठवी. ज्योतिषामध्ये सहाव्या स्थानाला 'रिपूस्थान' किंवा शत्रूस्थान म्हणतात तर आठव्या स्थानाला मृत्युस्थान म्हणतात. एकमेकांपासून सहाव्या-आठव्या स्थानी येणाऱ्या राशीत खूप विरोध असतो. म्हणजे कन्या ही द्विस्वभाव, स्त्रीजातीची, वैश्यवर्णी पृथ्वीरास. कन्येपासून सहावी येणारी कुंभ रास ही स्थिर, पुरूषजातीची, शुद्रवर्णी, वायुरास. अर्थात कन्येपासून आठव्या येणाऱ्या मेषेत आणि कन्येत जेवढा विसंवाद असतो, तेवढा विसंवाद कन्या-कुंभेत नसतो. वैश्य-शुद्र, पृथ्वी-वायु, बुध-शनि हे सर्व बऱ्यापैकी सुसंवादी असतात. फक्त इथे पत्नी तुमच्यापेक्षा अधिक बुध्दीमान असण्याची शक्यता खूप असते. तुम्ही 'एक ना धड भाराभर चिंध्या' या जातीतील विद्वान तर पत्नी एखाद्या विषयात चांगली तज्ज्ञ असू शकते. रसिकता, कोमल भावना, शृंगाराची आवड या सर्व विषयात कमी पडणारी ही तुमची पत्नी ठिय्या मारून बसून करायच्या कामात मात्र तरबेज असते. न दमता, न कंटाळता ती कामे करीत राहते. मकर-कुंभ राशीच्या स्त्रिया विशेष अपेक्षाच ठेवत नाहीत. त्यामुळे तुमच्या घरात वादविवाद तसे नाहीतच. तशी तुमच्याकडेही रसिकता कमीच, कोमल भावनाही कमीच त्यामुळे तुमचे हे कन्या-कुंभ जोडपे व्यावहारिक पातळीवरच अधिक असते. या जोडप्यात बाहेरच्या जगाशी संपर्काचे काम तुमच्यावरच अधिक, मुलांना धाकही तुम्हीच दाखवणार. कारण पत्नी सर्वापासून तशी अलिप्त. 'सुखेदुःखे समे कृत्वा' अशा वृत्तीची, फक्त तुमच्या हाताला हात लावून 'मम' म्हणणारी. मात्र एक ध्यानात ठेवा, तिला स्वतंत्र बुध्दी, विचार, मत असते आणि तुम्ही सल्ला विचारलात तरच सल्ला देणारी ही पत्नी 'कार्येषु मंत्री' म्हणून नक्कीच सुयोग्य असते. तिला योग्य पद द्या, आपोआप गीत उमटेल, 'तेरे मेरे सपने अब एक रंग है'।

राशीचक्रातील शेवटच्या मीन राशीची स्त्री ही तुमची खरी नैसर्गिक जोडीदार. म्हणजे कन्या-मीन या समोरासमोरच्या राशी-लग्न-सप्तहातील राशी. दोन्ही द्विस्वभाव स्त्री राशी हा सामाईक गुण तर पृथ्वी-जल तत्त्व आणि बुध-गुरू राशीस्वामी हे पूरक गुण. आधी म्हटल्याप्रमाणे पृथ्वी-जल एकमेकांचे शत्रू पण होतात आणि सहकारी पण बनू शकतात. बुध-गुरूंना ज्योतिषशास्त्रात एकमेकांचे मित्र मानीत नाहीत, पण गुरूच्या आकाशतत्त्वाचा गुण जो शब्द त्याला वाणीशिवाय अर्थ प्राप्त होईल का?आणि बुधाच्या अंमलाखालील वाणी(वाचा) शब्दच नसतील तर काय उपयोगाची ?म्हणजे बुध-गुरूच्या भूमिका पूरक होतात. तेच तुमच्या कन्या पती-मीन पत्नीच्या जोडप्यात आहे. प्रश्न एवढाच की, दोघांच्यातही निर्णयक्षमता कमी, दोघेही दुविधेत पडणारे, दोघांजवळही आक्रमकता, साहस, धाडस, धीटपणा कमी. तुम्ही व्यवहारी तर पत्नी भाबडी. तुम्ही देवाला नमस्कार करणार ते सुध्दा मनात शंका ठेवून की खरेच देव अस्तित्वात असतो का? आणि पत्नी उठता बसता देवाला, बुवा-महाराजांना नमस्कार करणार. तसे मुले तुम्हाला बनवू शकण्याची शक्यता कमी पण आईला सहज बनवतात. पत्नीत व्यवहारीपणा कमी, वाहत जाण्याची वृत्ती, शारिरीक बल कमी अशा समस्या असतात. आजच्या छानछोकीच्या जगात न बसणाऱ्या साध्या सरळ वृत्तीच्या या पत्नीत हळवेपणा, भाबडेपणा सुध्दा खूप असतो. पण त्याचबरोबर निःस्वार्थ बुध्दीने निर्व्याज प्रेम करण्याचा स्वभाव असतो. तुमच्या चतुरस्त्र बुध्दीपुढे तिच्या बुध्दीचा काही पाडाव लागणार नाही, हे पण या सत्त्वगुणी स्त्रीला माहीत असते. पण समर्पण हा भाव तिच्या मनात प्रबळ असतो. किंबहुना स्वतः ला विसरून तुमच्या संसारात रममाण होणारी ही एकमेव मीन पत्नी. तिचे समर्पण, तुमच्या ठायी असणारी भक्ती ध्यानात घेऊन तिचे पतीपरमेश्वर असणारे तुम्ही खरोखरीचे ईश्वरासारखे द्याळू बना, पत्नी नक्कीच म्हणेल, ''जीवनडोर तुम ही संग बांधी''.

अशी ही तुमच्या-कन्या पतीच्या-संसाराची बारा तऱ्हांची कहाणी. तुमच्या बुध्दीमत्तेला शोभतील अशा मिथून, कन्या, तूळ राशीच्या स्त्रियांपैकी किंवा थोड्या फार प्रमाणात समानधर्मी अशा वृषभ-मकर राशीच्या स्त्रियांपैकी तुमची जोडीदार असेल तर तुम्ही भाग्यवान म्हटले पाहिजे. सिंह, धनु, कुंभ राशीच्या किंवा अगदी कर्क राशीच्या पैकी एखादी जोडीदार मिळणे म्हणजे विशेष श्रेणीत उत्तीर्ण नाही पण प्रथम-द्वितीय श्रेणी. मीन राशी तर तुमची नैसर्गिक जोडीदार. वृश्चिक आणि मेष त्यातही खास करून मेष राशींच्या स्त्रियांपैकी एक मिळणे म्हणजे खरोखरच दोघांसाठी कसोटीचा काळ. पण कोणत्याही राशीची पत्नी मिळो, तुमचा विवाह प्रेमविवाह अथवा ठरवून झालेला असो, एक निश्चित ज्याअर्थी तुम्ही एकमेकांना वरले आहेत. त्याअर्थी तुमच्या कुंडल्यात लग्नराशी, चंद्रराशी, रविराशी जरी षडष्टकातील असत्या तरी काहीतरी समानत्व असेलच. कोठेतरी नवपंचम, समसप्तक असेल म्हणून तुम्ही एकत्र आलात. तेव्हा हा ईश्वरी संकेत समजून घ्या, आपल्या दोषांकडे पाहा. जोडीदाराचे गुण बघा आणि विवाहबंधनाला बंधन न समजता प्रेमाचा पाश समजा. सुखी व्हा.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा?
# क्षेत्रनिहाय प्रथम कऱ्हाडा

**अवधूत हर्डीकर**

**आपण व्यक्तिपूजक नाही; विसरून जाण्याची आमची रक्तातली सवय आम्हाला सोडत नाही. आणि माध्यमांमध्ये 'आपले किंवा आमचे लोक' तोडले तर इतरांची नांवे देतांना फक्त मधू, ईशा, वसंत अशी द्यायची आणि तेच 'आपले' असतील तर ठसठशीत आडनावांसह ती द्यायची ही कमालीची बुध्दी लढवून काढलेली शक्कल राज्य करीत आहे. त्यामुळे आपले नांव माध्यमामध्ये कोठेच येत नाही. त्यांचेवर वर्णनपर लेखही अपवाद म्हणून केव्हांतरी आला तरच.**

जुलै २०१२ ज्या 'संपर्क'च्या अंकापासून आपण विभिन्न क्षेत्रांमध्ये सर्वप्रथम असलेल्या या कऱ्हाडा व्यक्तिमत्वांची ओळख करुन देत आहोत. संख्येने अति-छोट्या, पण गुणवत्तेमुळे अनेक क्षेत्रांमध्ये सर्वप्रथम असलेल्या या कऱ्हाडा समाजातील अनेकानेक श्रेष्ठ व्यक्तींमुळेच; कऱ्हाड्यातील एखादा गुणी मुलगा किंवा मुलगी दिसली; ती कोणत्याही स्पर्धांमध्ये असेल; तर, तिला लवकरात लवकर आउट कशी व कोणत्या कारणाने करतां येईल; याचा विचार सर्व पातळ्यांवरुन लगेच सुरु होतो. अत्यंत प्रतिकूल अशा आणि गुणवंतांना वेचून मारक ठरलेली मानसिकता साम्राज्य करीत असतानाही गुणवान् कऱ्हाडे या सर्वांना पुरुन उरले; हे या लेखनमालेतून आपणाला उलगडत जाईल. आपण व्यक्तिपूजक नाही; विसरून जाण्याची आमची रक्तातली सवय आम्हाला सोडत नाही. आणि माध्यमांमध्ये 'आपले किंवा आमचे लोक' तोडले तर इतरांची नांवे देतांना फक्त मधू, ईशा, वसंत अशी द्यायची आणि तेच 'आपले' असतील तर ठसठशीत आडनावांसह ती द्यायची ही कमालीची बुध्दी लढवून काढलेली शक्कल राज्य करीत आहे. त्यामुळे आपले नांव माध्यमामध्ये कोठेच येत नाही. त्यांचेवर वर्णनपर लेखही अपवाद म्हणून केव्हांतरी आला तरच. त्यामुळे ही मी घेत असलेली नांवे वृत्तपत्रे, मासिके इतर अनेक माध्यमांतून कधी वाचल्याचेही आपणांला आठवणार नाहीत. म्हणून मुद्दाम या गुणवंतांचे आपणतरी स्मरण करु या!

सुदैवाने ''आम्ही आमच्याच लोकांची कोड-कौतुके करणार नाही, ती, लोकांनी केली तरच मानू'' असे अव्यवहारी आग्रहाने आणि भाबड्या आढ्यतेने म्हणणारे संपादक 'संपर्क'ला लाभले नाहीत. तिथपर्यंत ही गुणवंतांची सत्कृती चालू ठेवू.

श्री. सखाराम गणेश देऊस्कर, कलकत्त्याच्या दीपवाद या बंगाली भाषेतील दैनिकाचे संपादकांची ओळख करुन घेताना नर्मदेच्या उत्तरेकडील अनेक प्रांतामध्ये नामवंत ठरलेल्या काही कऱ्हाडा व्यक्तीमत्वांची नावे पाहिली. आता क्षेत्रनिहाय प्रथम असणाऱ्यांची आणखी नावे पाहू.

१) श्री. काशिनाथ नारायण दीक्षित- आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे पहिले डायरेक्टर जनरल म्हणून दीक्षितांचे नाव त्या क्षेत्रात आहे. या प्रकारची व या नावाची संस्था भारताची हवी ही कल्पना दीक्षितांचीच. लखलखीत मूलग्राही बुध्दी आणि अनेक क्षेत्रांमध्ये असलेली विद्वत्ता यामुळे श्री कशिनाथपंत दीक्षितांबद्दल सर्वदूर अनेक क्षेत्रांमध्ये आदर होता. दिल्लीच्या विद्वानांच्या वर्तुळात त्यांना अनेक सन्मान लाभले.

२) डॉ. विजय ढवळे, मुंबई-कॅनडा

कॅनडाच्या स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्या शासकीय समारंभात आणि ब्रिटनची राणी सिंहासनाधिष्ठित होऊन पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने झालेल्या कॅनडाच्या शासकीय समारंभामध्यें - दोन्ही वेंळा ज्या व्यक्तीचा सत्कार करण्यात आला अशी पहिली महाराष्ट्रीय व्यक्ती म्हणजे डॉ. विजय ढवळे- नंतर १९९२ मध्यें कॅनडाच्या १२५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभातही सुवर्णपदक देऊन ढवळे यांचा सत्कार झाला. तो त्यांच्या नि:स्वार्थी समाजसेवेबद्दल! एका व्यक्तीचा कॅनडा-शासनाने दोनदा मेडल् देऊन सत्कार लाभणारी ढवळे ही पहिली आशिया खंडातील व्यक्ती! अनेकांना हवं हवंसं वाटणारं आश्वासक व्यक्तिमत्व.

काही उच्च तत्त्वे पुढे ठेऊन त्यांचे आचरण सदैव करणारा, उत्तम वक्ता, नि:स्वार्थी देशसेवक, राजकीय-सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कामांमध्ये अग्रेसर,कॅरम-बुद्धिबळ खेळाडू, संशोधकवृत्तीचा, १६ सामाजिक संस्थांशी संबंध असलेला २००३ पर्यंत ज्यांना एकूण ६३ बक्षिसे सामाजिक कार्याबद्दल मिळाली, पैशाच्या गुंतवणुकीबाबत सल्ला देणारी ज्यांची कंपनी आहे. वार्षिक तीन लाख मैलांचा ज्यांचा प्रवास होतो. आणि अनेक उच्च मानवीय गुणांचा संगम ज्या व्यक्तिजवळ

आहे, असे हे व्यक्तिमत्व!

मथुरेला यमुनेश्वरचा पूल ज्या ढवळे यांनी बांधला ते यांचे वडील!

३) श्री. आशुतोष गोवारीकर, मुंबई

ऑस्कर ॲवॉर्डच्या फायनल राउंडला ज्याची सिनेमा फिल्म – पोचली असा पहिला आणि समर्थ असा महाराष्ट्रीय सिने डायरेक्टर, कऱ्हाडा व्यक्तिमत्वांचे अनेक उत्तम सद्‌गुणांचा ठेवा यांच्यामध्ये आहे. सरपोतदार आणि राजा नवाथे यांचे नंतर, सिनेकला–दिग्दर्शनामध्ये आणि उत्तम मॅनेजमेंट करतां उदाहरण म्हणून असलेले उमदे व्यक्तिमत्व. मंदार देवस्थळी हे याच विभागातले पुढचें नांव लक्षात असू द्या.

४) श्री जगन्नाथ गंगाधर शास्त्री गुण्ये तथा स्वामी कुवलमानंद, लोणावळा

अनेक विद्याशाखांमध्ये प्रावीण्य असलेले विद्‌वान आणि त्याचवेळी कनवाळू व्यक्तिमत्व असणे; हे दुर्लभ दर्शन पं. गुण्ये या व्यक्तिमध्ये दिसते. त्यातही भारतात योगविद्येचे प्रारंभिक ते उच्चविद्या अध्यापन करणारें, मोठ्या लोकवस्तीजवळचे केंद्र सर्वप्रथम काढणाऱ्या व्यक्तींमध्ये पं. गुण्ये यांचा 'कैवल्यधाम' लोणावळा या संस्थेची गणना होते. सध्या योगविद्येच्या पाट्या गल्लोगल्ली दिसतात. त्याप्रकारची ही योगविद्या नव्हती. आसनांची कमालीची जाहिरात करुन शारिरीक कसरती विद्यार्थ्यांना शिकविणे म्हणजे 'योगविद्या' ही मुळांत चित्तवृत्ती चे नियमन करायला शिकवणारी, अंत:करण मनोव्यापारे एका विशिष्ट शिस्तीत, नियमित करुन, ते सदैव शुध्द व पवित्र राखणे आणि प्रत्येक व्यक्तीची मानसिक गुणवत्ता आपले मूळ स्वरुप घेण्याइतकी समर्थ करीत जाणे याकरीता योगशास्त्र आहे. पतंजलीच्या योगविद्येतील १९५ सूत्रांपैकी आसन या विषयावर फक्त तीन सूत्रे आहेत. बाकी सर्व भाग चित्तवृत्ती, मनोव्यापार, वृत्तपत्रिका, यम–नियम आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, समाधि अशा आठ अंशांचे विवरण यांमध्ये केलेले आहे. सिद्धिंचीही माहिती यामध्यें आहे. हिमालयांत जाणाऱ्या फार थोड्या लोकांमध्ये सीमित असलेली ही गूढविद्या पं. गुण्ये यांनी महाराष्ट्रात प्रथम सार्वजनिक केली. ज्या गृहस्थांना अजूनही अध्यात्मविद्या आणि धार्मिक क्रियाकर्म यातला फरकही कळलेला नाही. अशा व्यक्तीला आम्ही सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक व्यक्ती, योगाचार्य अशा शब्दांनी गौरवितो. माध्यमांच्या साह्याने बव्हंशी अशाच प्रकारची मानसिकता लाभलेल्या, वरवरच्या वेषभूषवरुन व मधाळ भावूक शब्दांच्या वापरावरुन व्यक्तीला सर्वश्रेष्ठ ठरविणाऱ्या समाजात यांचे वारेमाप कौतुकही होते. पण अस्सल योगविद्येचे मर्म सांगणाऱ्या पं. गुण्ये स्वामी किंवा पुरोहित स्वामी संसाराच्या.. वा सर्वांच्या पलीकडे पोचलेल्या व्यक्तीचे नांवही न घेण्याची वृत्ती येथे दिसते. कमीत कमी आपण रत्नांना ओळखूया तरी! आणि पक्षपाती माध्यमांमधून अशा लोकांची नावं आली नाही; तरी निदान आपण तरी रत्नांना 'रत्न' असं म्हणू या.

५) श्री. लक्ष्मण महेश्वरशास्त्री हळबे, वाई, जि. सातारा.

विधवाविवाह' हा त्या काळातला ज्वलंत विषय घेऊन वाईच्या पं. लक्ष्मण शास्त्री हळबे यांनी, मुक्तमाला ही पहिली मराठी कादंबरी लिहिली. पहिला मराठी कादंबरीकार कऱ्हाडा आहे.

६) डॉ. आशुतोष अवधूत हर्डीकर, होबार्ट, ऑस्ट्रेलिया.

मुळांत तोळा–मासा गुणवत्ता असलेली माणसं, माध्यमांच्या साह्याने मोठी करता येतात, आणि खरी गुणवान माणसं, जाणून–बुजून दुर्लक्षित रहातात. घरातली माणसं सुध्दा अशा मुलांची गुणवत्ता शब्दानेही कोठे सांगत नाहीत. कारण आपल्याच मुलाची गुणवत्ता बोलायची नसते. डॉ. आशुतोष हर्डीकर, हे माझे ज्येष्ठ चिरंजीव. कार्डिओ थोरॅसिक सर्जन म्हणून फार लहान वयात याने कीर्ती मिळविली आहे. मी अनेक हुशार मुले जवळून पाहिली आहेत, पण त्यांनी; त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रांमध्ये प्रत्येक परीक्षेत विभिन्न विद्यापीठांमधून डिस्टिक्शन् मार्कांच्याही वरचे मार्कस् मिळवून पहिल्याच प्रयत्नाने सतत सर्व प्रथम येणारी मुले क्वचित कोठेतरी, केव्हांतरी ऐकू येतात. डॉ आशुतोष याने पुणे विद्यापीठाची एम.बी.बी.एस. व एम.एस्. या दोन्ही परीक्षा सर्व प्रथम येऊन समुत्तीर्ण केल्या. डी.एन्.बी. दिल्ली–बोर्ड आणि एम्.सी.एच्. मुंबई युनिव्हर्सिटी दोन्ही ठिकाणी सर्व प्रथम! एम्.सी.एच्. ला तर त्याचे रेकॉर्ड आहे. इंग्लंडच्या ग्लासगो युनिव्हर्सिटीचा FRCS. आणि ऑस्ट्रेलियाचा FRACS सर्वपरीक्षा मधून भ्राजमान यशाचा मानकरी! एम.एस्. करीत असतानांच, छातीत पेन घुसलेल्या अकरावीच्या विद्यार्थ्यांचे हार्ट ऑपरेशन स्वत:वर जबाबदारीवर घेऊन केलेला मुलगा!

माझ्या आजवरच्या माहितीप्रमाणे MBBS, MS, DNB, MCH या सर्व प्रगत परीक्षांमधून डिस्टिंक्शन् च्या वरचे मार्कस् मिळवून, सतत पहिल्याच प्रयत्नात पहिला येत राहणारा हा पहिला


*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

मुलगा आहे. हे जवळून पहायला मिळणे. अनुभवणे दुर्मिळ आणि अपवादात्मक आहे.

७) पद्मभूषण डॉ. नारायण सुब्बराव हर्डीकर, तिळवळ्ळी–घटप्रभा

भारताच्या पार तंत्र्याच्या काळात, उद्याचा भारत कसा असेल याचा विचार जे सतत करत होते; देशावर नि:स्वार्थी आणि एखाद्या भक्तासारखे प्रेम करणारे लहानपणापासून एका विशिष्ट शिस्तीत तयार झालेले, संस्कारक्षम वयात याचेच शिक्षण घेतलेले तरुण देशाला सतत लागणार आहेत, तरच स्वार्थरहित देश सेवकांचा देशाला सतत पुरवठा होत राहील; हे दि. ७.५.१८८९ या दिवशी जन्मलेल्या एका दूरदृष्टीच्या नेत्याला सतत वाटत रहायचे. अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेला हा तरुण याच गोष्टीचा विचार करीत रहायचा. पं. मदनमोहन मालवीयांशी केलेल्या वैचारिक आदान प्रदानातून देशाकरीता सर्वस्व वहाण्याची शपथ घेतलेले, उमदे आणि देशभक्तीने भारलेले तरुण, देशाला सतत पुरविण्यासाठी क्रांतदर्शी अशा डॉ. एन्.एस्. हर्डीकर तरुणाने 'हिंदुस्थानी सेवादल' ही संस्था या देशात सर्वप्रथम १९२३ साली नागपूरला स्थापन केली. १९२४ साली 'हिंदू सभेची स्थापना आणि नंतर १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना याच नागपुरात झाली.

पं. जवाहरलाल नेहरूंना, डॉ. हर्डीकरांची ही कल्पना अभिनव वाटली. आणि त्यांचा डॉ. हर्डीकरांना सतत पाठिंबा होता. चांगल्या गोष्टीमध्येंही वाईट भावनेने पहाणाऱ्या आणि चांगल्याबद्दल वरिष्ठांचे मत कलुषित करणाऱ्या परंपरांमुळे, हर्डीकरांना, नेहरुंशिवाय कोणाचाही म्हणजे म. गांधींचाही पाठिंबा मिळाला नाही. पण याचे महत्त्व जाणलेले काही लोक नंतर जेव्हा काँग्रेस मधून फुटले तेंव्हा त्यांनी त्याच प्रकारची 'राष्ट्रसेवा दला'ची स्थापना केली. दक्षिण भारतात डॉ. हर्डीकरांची कल्पनारुजली होती. बंगलोर महानगर पालिकेच्या समोरच्या मोठ्या चौकाला डॉ. हर्डीकर स्क्वेअर असे नांव त्यांच्या स्मरणार्थ दिले आहे. पुढच्या काळाने, डॉ. हर्डीकरांच्या दुष्टीचे अनुपालन करणे आवश्यक होते; हेच सिध्द केले. डॉ. हर्डीकर राज्यसभेचे सभासद होते. त्यांचे स्मरणार्थ पोस्टल स्टँप निघाला. लहान वयातच राष्ट्रप्रेम जागृत झालेले, समर्पित वृत्तीने कार्य करणारे, दृढनिश्चयी आणि कधीही श्रध्दा डळमळीत न होणारे आणि देशावरच श्रध्दा असलेले हजारो–लाखोंच्या संख्येने, तरुण देशाला लागतील हे त्यांनी सर्वांच्या आधी ओळखले आणि कार्याला सुरुवात केली. या मुलाच्या, परदेशातल्या शिक्षणासाठी अत्यंत जवळच्या दोन्ही मित्रांनी आपल्या अंगावरचे दागिने काढून दिले होते. याच उद्देशाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला डॉ. हेडगेवारानंतर, पूज्यश्री माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांचे नेतृत्व लाभले; आणि त्यांनी ३२–३३ वर्ष स्वत:च्या अथक प्रयत्नांनी अंतर्बाह्य विरोधकांशी सामना करीत, काटेरी अशा राजकीय, सामाजिक–सांस्कृतिक स्थितीतून प्रवास करीत लाखो देशसेवकांना घडविणारे; कणखर, शिस्तप्रिय, दृढनिश्चयी आणि समर्पित व्यक्तिमत्वांची देशसेवकांची रांग तयार केली.

आपल्या देशाला अनेकविध विचारांचे नेते लाभले त्यांमध्ये – क्रांतिकारक होते, इंग्रजांना धाक निर्माण करणारे होते. चळवळी उत्पन्न करणारे होते. ज्या चळवळीतून शेवटी आपलेच नुकसान करु शकणारी मानसिकता भविष्यात निर्माण होत राहील अशी स्थितीही निर्माण झाली. पण ज्यांमुळे शांत राहून, उत्तम विचारांनी युक्त असे समर्पित देशसेवकच सतत तयार होत राहतील. असे विचार प्रत्यक्ष अमलात आणणारी विचारसरणी देणारे हे दोघे रचनात्मक विचारांचे क्रियाशिल विचारवंत आपल्या कऱ्हाडा समाजाने दिले. हेच त्याचे वैशिष्ट्य. आचार्य स.ज. भागवत आणि आचार्य जावडेकर, या सारख्या कांहीनी या अशा रचनात्मक विचाराना तत्त्वज्ञानाचे स्वरुप दिले. हे सर्व 'कऱ्हाडा' होते. हे स्वत: आक्रमक नव्हते. शांत राहून कार्य करणारे होते.

८) आचार्य बाळशास्त्री जांभेकर, पोंभुर्ले–मुंबई (जन्म–२०–२–१८१२, मृत्यू १७.५.१८४६)

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी या देशात नव–विचार प्रथम सुरु केले असे ख्यातनाम विचारवंत श्री. य.दि.फडके म्हणाले आहेत. महादेव गोविंद रानडे यांनी त्यांच्या विचारांचे ऋण मानले. भारताचे पितामह दादाभाई नवरोजी, तसेच केरुनाना छत्रे, भाऊ दाजी मंडलीक, काशिनाथ शास्त्री तेलंग, फिरोजशहा मेहता यांच्यासारखे धुरीण ज्यांना गुरुस्थानी मानत असते. अशी एकमेव व्यक्ती म्हणजे बाळशास्त्री जांभेकर! ते अनेक क्षेत्रामध्ये पहिले ठरले.

१) स्वदेशी, स्वभाषा यांचा गंभीर विचार करणारे ते साक्षेपी असे पहिले विद्वान होते. ते राजकारणी नव्हते.
२) त्यावेळच्या मुंबई राज्याचे ते पहिले शैक्षणिक अधिकारी होते.
३) वयाच्या एकोणिसाव्या वर्षी सेक्रेटरी या हुद्याचे ते पहिले एतदेशीय अधिकारी होते.
४) प्रोफेसर ही श्रेणी मिळवणारे ते पहिले वहिले एत्तद्देशीय अधिकारी होते.
५) कुलाबा वेधशाळेचे (observatory) ते पहिले डायरेक्टर होते.
६) मराठी भाषेतले पहिले वृत्तपत्र 'दर्पण' त्यांनी दि.०६.०१.१८३२ या दिवशी त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षी सुरु केले.
७) मराठीतले व्याकरण या विषयाचे संवादात्मक पहिले पुस्तक त्यांनी लिहिले. १८६३ पर्यंत त्याच्या चौदा आवृत्या झाल्या होत्या.
८) महाराष्ट्रात आधुनिक विचार आणणारे ते पहिले कृतिशील विचारवंत होणे.
९) द्वैभाषिक वृत्तपत्राचे पहिले संपादक म्हणूनही बाळशास्त्री जांभेकरांचे नांव आहे.
१०) ज्योतिष शास्त्रामधील नक्षत्रांच्या भागांना असलेल्या मूळ ग्रीक पुराणातल्या नावाच्या ठिकाणी, त्यांनी 'कश',प्लक्ष अशा संस्कृतला जवळची नांवे सुरु केली.

यांचे पुतणे श्री.गंगाधर जांभेकर यांनी आचार्य बाळशास्त्रींचे चरित्र तीन खंडांमध्ये प्रसिध्द केले आहे. यावर्षी दि. २०.०२.२०१२ यादिवशी त्यांना जन्माला येऊन दोनशे वर्षे झाली. हे त्यांच्या जन्माचे द्विशताब्दि–वर्ष! अशा व्यक्तींमुळे समाजाला सौभाग्य येते. एक–दोन नव्हे तब्बल दहा क्षेत्रात जांभेकर पहिले आहेत. अशांच्या शिवाय नमस्कार तो कोणाला करायचा?

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्‌गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

## मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर


# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com   E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# पवित्र अन् रमणीय - बद्रीकेदार

**डॉ. गायत्री यल्लापूरकर, ९७४२०२१३५९**

आमचं शेवटी हिमालयात जायचं ठरलं. जास्त दिवस जाता येत नसल्याने चारधाम ऐवजी फक्त दोन धाम –बद्री केदार करायचंही नक्की झालं. माझे भाऊ 'गढवाल मंडळ विकास निगम'च्या आयोजित चार धाम सहलीना जाऊन आले होते अन् त्यांचा अनुभव 'खूप छान' असा होता. म्हणून मग नेटवर GMVN ची वेबसाईट पाहून, माहिती घेतली अन् ७ मेला निघणाऱ्या 'दिल्ली टू – बद्रीकेदार' सहलीचं ई–बुकींग केलं. लगेचच दिल्लीला जाण्यासाठी गोवा एक्सप्रेस– (निजामुद्दीन) चे बुकींग केले. एप्रिलमध्ये बुंकींग केले तर वेटींग लिस्ट – ५५/५६ नंबर होते. फेब्रुवारी संपत आला होता. पण दोन महिन्यात कन्फर्म रिझर्व्हेशन होईल असा अंदाज होता. पण तो सपशेल चुकला. एप्रिल संपून मे सुरु झाला तरी बुकींग W/L २५/२६ पेक्षा उतरेना. म्हणून मग नेटवरच इतर पर्यायांची पण चाचपणी सुरु केली. शेवटपर्यंत रिझर्व्हेशन झाले नाहीच. मग विमानाच्या अतिखर्चिक (आयत्या वेळी High दर) पर्यायाऐवजी बेळगाव–अहमदाबाद व अहमदाबाद–दिल्ली असा बसचा पर्याय निवडला. चक्क फक्त दोन तास आधी बुकींग करुनही सुदैवाने शेवटची २ तिकिटे मिळाली. अन् आम्ही ४ मेला दुपारी ४ वाजता सुटणाऱ्या VRL च्या बेळगाव–अहमदाबाद या मल्टिॲक्सल (सिटींग) बसमध्ये बसलो अन् मग हुश्श केलं. सकाळी जाग आली तेव्हा गुजराथी पाट्या सगळीकडे दिसत होत्या. चहासाठी गाडी एका हॉटेलमध्ये थांबली तर चहाबरोबर सर्वांनाच खारीनी भरलेली छोटी प्लेट देत होते. हवं तर खा नाहीतर ठेवा. मजा वाटली, मग फ्रेश झाल्यावर गम्मत बघत जाईपर्यंत १० वाजेपर्यंत अहमदाबाद आलं सुध्दा! सिटीलाईट सिनेमाजवळच्या एरीयात एका बऱ्याशा हॉटेलमध्ये रुम घेऊन फ्रेश झालो. कोपऱ्यावर असणाऱ्या शीख चालकाच्या कॅन्टीनमध्ये सामोसे–फाफडा मिरची असा नाश्ता करुन चौकशी करुन पार्श्वनाथ टूरच्या ऑफीसमध्ये गेलो. १ दिल्ली बस नुकतीच गेली असून आता दुपारी २ वाजता दुसरी A/c स्लीपर बस आहे; ती सकाळी ८ वाजेपर्यंत दिल्लीला पोचते हे कळले. रेल्वे रिझर्व्हेशनच्या वेळी आमच्यावर रुसलेले नशीब आता मात्र साथ देत होते. या बसची शेवटची २ तिकिटे आम्हाला मिळाली तेंव्हा १२।। वाजले होते. मग रिक्षाने धावतपळत रुमवरुन– सामान घेऊन ते, त्या बसवाल्याच्या ऑफीसमध्ये ठेवून जवळच्या हॉटेलमध्ये कसेबसे जेवलो. जेवण पंजाबी छान होते. अन् परतेपर्यंत ऑफीससमोर बस लागली होती व आमच्याच नावाचा पुकारा होत होता. घाईने बसमध्ये शेवटच्या स्लीपरवर विसावलो. 'अब दिल्ली दूर नहीं' म्हणत! आता मनावर असणारा ताण मात्र पूर्णपणे ओसरला होता. उदयपूर–जयपूरमार्गे ही आमची बस दुसऱ्या दिवशी सकाळी ९।। ला दिल्लीला पोचली. ह्यांनी तोपर्यंत सहप्रवाशांशी बोलून माहिती मिळवली होती. त्याप्रमाणे नवी दिल्ली जवळच्या करोलबागला उतरलो. बऱ्यापैकी हॉटेलमध्ये माफक भाड्यात रुम मिळाली. मग स्वत:चे आवरुन बाहेर पडलो. पोटपूजेसाठी जवळच असणाऱ्या 'आहार–विहार' रेस्टॉरंटमध्ये जिलबी पुरी–भाजी चहा असा भरपेट नैवेद्य दाखवला. समोरच बसस्टॉप होता. वेटरने अगदी बाहेर येऊन बस दाखवली. दिल्ली दर्शन बस सुटतात त्या 'कॅनॉट प्लेसला' उतरलो. चौकशी केल्यावर ह्या सगळ्या दर्शन 'बस सकाळी ९ लाच सुटतात असे कळले. मग मेट्रो रेल्वे व अक्षरधाम मंदिर ह्यांचाच अनुभव घ्यायचा ठरवले.



**बद्रीकेदार**

उद्या आमची बद्रीकेदार सहल 'बाराखाम्बा' रोड वरुन निघणार होती. ते पण बघायचे होते. बाराखाम्बा रोडवर अगदी कोपऱ्यावरच मेट्रो रेल्वेचे स्टेशन दिसले. अक्षरधाम स्टॉप आहे असेही, कळले. मग चकाचक मेट्रो प्लॅटफॉर्मवर जाऊन (खाली भुयारात) देखण्या मेट्रोने अक्षरधाम मंदिरात गेलो.(रू.१५/–) ही मेट्रो जमिनीखालून, जमिनीवरुन व शहरावरुन अशा सर्व मार्गांवरुन जाते मजा आली. शेकडो एकर जागेत वसवलेले अक्षरधाम हे 'स्वामी प्रभुपादानंदांचे' मंदिर जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर आहे. याला प्रवेशमूल्य अजिबात नाही. लालसर दगड / संगमरवरात कोरीव कामांनी नटलेले हे मंदिर अप्रतिम आहे. अत्यंत भव्य व दिलखेचक अशा ह्या मंदिरात जाताना सुरक्षाव्यवस्था एकदम कडक आहे. पैशाचे पाकीट –पाण्याची पारदर्शक बाटली सोडून सारे मंदिराच्या लॉकरमध्ये ठेवावे लागते. फॉर्ममध्ये ठेवलेल्या वस्तू व स्वत:ची माहिती द्यायची. खाणे पण आत नेता येत नाही. हिरव्यागार हिरवळी–फुलझाडे, सरोवरे ह्यांनी वेढलेले हे मंदिर परिसर खूप छान आहे भोवताली असणाऱ्या भव्य सलग रक्तवर्णी कमानीतून मंदिर प्रदक्षिणा पण करता येते. वेळाच्या अभावी आम्ही थोडे फिरलो व परतलो. प्रवेशद्वाराच्या थोडे अलीकडे रेस्टॉरन्ट आहे, (अक्षरधामचेच), तिथे आईस्क्रिम खाऊन हॉटेलवर मेट्रोने परतलो.

दुपारी विश्रातीनंतर चांदणी चौकात गेलो. दिल्लीची प्रसिध्द पराठा गल्ली मला अनुभवायची होती. तिथेच लाल किल्ला आहे. मग संधीप्रकाशातच लाल किल्ला बाहेरुन पाहिला. १०/१२ गल्ल्या ओलांडल्यावर विचारपूस करुन एकदाचे पराठा गल्लीत शिरलो. तिथे ४/६ दुकाने पराठेवाली दिसली. त्यातल्या सर्वात जास्त गर्दी असणाऱ्या दुकानात शिरलो. तिथेच स्व. इंदिरा गांधींचो फोटो – (पराठ्याचा आस्वाद घेताना) लावला होता. मग तिथल्या मुलाने रसदार आलू, चटण्या घातलेली कप्प्यांची गोल थाळी समोर ठेवली. मग लेमन पराठा (खूप आंबट असतो), रबडी पराठा अशा एरवी न मिळणाऱ्या पराठ्यांची लज्जत चाखली. वर झकास लस्सीचा नजराणा

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. Max Distance between spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range | rpm | (8)75-1850 | (8) 80-2310 |
| Vertical adjustment of arm | mm | 533 | 660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in

*With Best Compliments From...*

# J.P.F. METACAST PVT. LTD

**Manufacturers of** C I & S G I, machined & unmachined Castings.
Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Component
& Intricate Castings, Cylinder Heads.

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

An ISO 9000:2008 COMPANY
1ST ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI - 1998
Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007

**Commendation Certificate in Small Scale Manufacturing Industry**

695C, Udyambag P.O., Belgaum - 590 008
Ph. : 0831-2440664, Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com Website : www.jpfmetacast.com

पोटाला दिल्यावर 'पोटोबा' एकदम खूश! उद्या लवकर उठायचे होते. कारण आमच्या बद्रीकेदार टूरसाठी 'रिपोर्टिंग टाईम' दिला होता. सकाळी ६।। चा!

सगळे आवरुन आम्ही रिक्षाने ६ वाजता बाराखाम्बा रोडवर पोचलो पण GMVN चे ऑफिस काही केल्या सापडेना! मग एका ठिकाणी एक कार व एक टेम्पो ट्रॅव्हलर उभी असलेली दिसली, तिकडे गेलो. आमचा अंदाज अचूक ठरला. आमच्याच टूर नं. २ चे प्रवासी होते ते. जवळ गेल्यावर झुडुपात लपलेली 'इंद्रप्रकाश' नावाची (GMVN दिल्ली ऑफिस) पाटीपण दिसली. मग आमचे नाव सांगून टेम्पो ट्रॅव्हलर मध्ये बसलो. श्री. मॅनेजरनी सर्वांची नावे पुकारुन सर्वजण जमा झाल्याची खात्री करुन घेतली व आम्हाला निरोप दिला. आम्ही एकूण १३ प्रवासी होतो. आम्ही दोघे व बेंगलूरहून एक तिशीची विवाहीत सॉफ्टवेअर इंजिनिअर स्त्री कर्नाटकातून, रेड्डी दांपत्य हैद्राबादहून, कृष्णा दांपत्य जोधपूरहून, जोशी दांपत्य उदयपूरहून एक बंगाली गृहस्थ पुण्याहून व तिघीजणी (आई+लेकी) कोलकत्त्याहून असे सगळे आता एकत्र असणार होतो. तिघी बंगाली वाघीणी कारमधून व आम्ही बाकी सारे टेम्पो ट्रॅव्हलमधून निघालो. GMVN ने या गाड्या भाड्याने घेतल्या होत्या. आम्ही सारेच नवीन. GMVN ने दिलेल्या टूर प्रोग्रॅमची माहिती या ड्रायव्हरना नव्हती. मग हे व श्री. जोशीनी लिडरशीप घेऊन सूत्रे हाती घेतली व ड्रायव्हरला सूचना दिल्या. थोडेच अंतर गेल्यावर टेम्पो ट्रॅव्हलर पंक्चर झाली. सुदैवाने पंक्चर काढणारा वाटेत जवळच मिळाला. पंक्चरचे पैसे ह्यांनीच दिले. थोड्या वेळाने नाश्त्यासाठी थांबलो. सर्वत्र 'शिकंजी' मिळेल. अशा पाट्या दिसत होत्या. चौकशी केल्यावर ते सोड्यासारखे एक पेय आहे असे कळले. हॉटेलमधे गेल्यावर 'पराठ्यांचा' इलाका सुरु झाल्याचे जाणवले. नाश्ता-दुपारचे-रात्रीचे जेवण सारे पराठे व पंजाबी छोले-भाज्या असेच. आम्ही मात्र सँडविचचा हलका नाश्ता घेतला.

हरिद्वारला १-१।। पर्यंत पोचून तिथे गंगास्नान असा कार्यक्रम होता. पण पंक्चरमुळे पोचेपर्यंतच २।। वाजले. त्यामुळे हे राहिलेले गंगास्नान येताना करायचे असे ठरले. हरिद्वारला रेल्वेस्टेशनसमोरच GMVN चे तर्फे 'ऋषिलोक' हे अत्यंत सुंदर असे गेस्टहाऊस आहे. वृक्षराजीने वेढलेल्या रमणीय निसर्गसुंदर जागेत स्वच्छ-नेटके-ऐसपैस रुम्सचे हे गेस्टहाऊस व सभोवताली अशी अनेक गेस्ट हाऊस सारेच सर्व सुखसोयींनी युक्त असेच आहे. नुसते पाहूनच प्रवासाचा सारा शीण पळून गेला. येथे आल्याआल्या GMVN च्या गाईडने -श्री. सूरजमणी या संस्कृतच्या पंडीताने आमचे हसऱ्या मुद्रेने स्वागत केले. त्याना सारे 'पंडितजी'च म्हणत होते.

मागच्याच वर्षी येथील 'परमार्थ निकेतन' आश्रमात एका ब्राझिलच्या ग्रुपला आयुर्वेदाची माहिती देण्यासाठी मी येथे मोठ्या भावाबरोबर आले होते. पण त्यावेळी तेथील स्वामीजी 'श्री चिन्मयानंदजी' यांची भेट ते परदेशात असल्याने झाली नव्हती. म्हणून आता भेटण्यासाठी रामझुल्याजवळ असणाऱ्या ह्या जगप्रसिध्द आश्रमात गेलो. ऋषिकेशला योगाची 'जागतिक राजधानी' म्हटले जाते. हजारो लोकांबरोबर आम्हीपण त्यात सामील झालो. श्री स्वामीजीनी एक मोठाच संकल्प केला आहे. 'नद्या प्रदूषणमुक्त करण्याचा'. सध्या ते 'गंगा' नदी प्रदूषणमुक्त करण्याच्या कार्यात गढले गेले आहेत. त्यासंदर्भात अनेक देशविदेशातील मान्यवर त्याना भेटायला आले होते. आम्हीपण त्याना भेटलो व त्यांचे आशिर्वाद घेतले.

– क्रमशः

# सद्गुरु

प्रभातीच्या किरणांनी न्हाऊन निघावे
दिवसाच्या प्रारंभी सद्गुरूंसी स्मरावे ।।

दिनचर्येची सुरूवात सत्वर करावी
कर्तव्याच्या पाठराखणीस सद्गुरूकृपा स्मरावी ।।

माणूस म्हणून जगणे दासबोधातून शिकावे
हरघडी मनापासून सद्गुरूंना स्मरावे ।।

शरीराच्या बळकटी सेवावे अन्न पाणी
मनाच्या खंबीरतेसाठी सद्गुरूंना आणा मनी ।।

काम, क्रोध, मद, मत्सर त्यागीत जावे
त्याकरिताच मनापासून सद्गुरूंना स्मरावे ।।

सद्गुरू, सद्गुरू मनी चिंतीत जावे
त्यातच 'स्व' प्रगतीचे गमक शोधावे ।।

**वैदेही पळसुले**


# निकेत फोटोज्

**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे - ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**

# मंदिरात देवासमोर कासव कां?


**गणेशविज्ञान - कृ.भा. परांजपे.**

१) कासव आपल्या पिलाचे पोषण, स्निग्ध दृष्टीने करते. पिलू आईच्या नजरेत व आई पिलाच्या नजरेत राहते आणि पिलाचे पोट भरते. आपण कासवाच्या पिलाप्रमाणे देवाशी एकाग्र व्हावे, म्हणजे देवही आपले लालन-पालन करील, हे आपण कासवापासून शिकावे.

२) कासव संकटप्रसंगी आपले चार पाय, डोके आणि शेपूट पाठीखाली ओढून घेते. त्याप्रमाणे आत्मकल्याणेच्छु साधकाने विषयांनी इंद्रायांवर आक्रमण केल्यास, त्या इंद्रियांना आपल्या आंत ओढून घ्यावे. इंद्रियांचा निग्रह करावा. हे आपण कासवापासून शिकावे.

३) कासवाची पाठ  टणक व पोट नरम असते. जगाचे आघात पाठीवर सोसणे व पोटाप्रमाणे जगांत नरम रहावे. हे कासवापासून शिकावे.

४) कासव पाण्यांतही राहू शकते. जमिनीवरही राहू शकते. संकट प्रसंगी आपल्या रक्षणार्थ कासव पटकन पाण्यात शिरते. भय नसेल तेव्हा खुशाल जमिनीवर आराम करते. काळ, वेळ पाहून कसे वागावे, हे आपण कासवापासून शिकावे.



५) कासव दीर्घकाळ श्वासोच्छवास करतो. ही त्याची यौगिक प्रक्रियाच आहे म्हणून त्याचे आयुष्य १०० वर्षे गृहीत धरले आहे. श्वास मंदगतीने चालावा, ही योग प्रक्रिया आपण कासवापासून शिकावी.

६) कासव ज्या विहीरीत किंवा तळ्यात राहतो तेथील पाणी तो शुध्द व निर्जंतुक ठेवतो. सर्वांनी आपल्य सभोवतीचे वातावरण शुध्द व पवित्र ठेवावे. हे आपण कासवापासून शिकावे.

संग्राहक - गणेश गुर्जर


सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

**काटदरे**

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

**चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती**

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

# काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**

**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

# शरीर व मनाला संतुलित ठेवणारे अथर्वशीर्ष

**गणेशविज्ञान – कृ.भा. परांजपे.**



नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवात गणेशाच्या जयघोषात आणि जयजयकारात गणेशाचे आगमन झाले आणि सर्व वातावरण गणेशमय झाले होते. गणेशाच्या अथर्वशीर्षाच्या लहरींचे स्पंदन सर्व वातावरणात पसरेल असे हे स्तोत्र शरीर मनाला कसे संतुलित करते त्याचेच हे वर्णन –

'थर्व ' म्हणजे चंचल आणि 'अथर्णव ' म्हणजे अचंचल अर्थात स्थिर. याशिवाय हे अथर्णव ऋषींनीही लिहिलेले आहे त्यामुळे या स्तोत्रात अतिशय स्थिरता येण्याचे आणि शरीर, मन, बुध्दि यांचा समतोल राखण्याचे सामर्थ्य आहे. कुठल्याही स्तोत्राचा अर्थ समजून ते म्हटले तर त्याचा मनाला जास्त आनंद मिळतो आणि त्याचा परिणाम जास्त होतो. नाहीतर ती नुसतीच पोपटपंची होते. अर्थात् त्याने सुध्दा उपयोग होतोच होतो. पण अर्थ समजून म्हणणे म्हणजे दुधात साखर.

ॐ गं गणपतये नम:। एकदन्ताय विद्महे। वक्रतुंडाय धीमही। तन्नोदंति प्रचोदयात् । हा गणेश गायत्री मंत्र. प्रत्येक देवतेचे गायत्री मंत्र आहेत. गायत्री छंदातील मंत्र म्हणून गायत्री मंत्र.

जी देवता नेहमी आशिर्वाद देते अशा देवतेचे नेहमी ध्यान करावे. सिंह वाहिनी, व्याघ्रवाहिनी देवींपेक्षा कमलासना लक्ष्मीचे ध्यान जास्त चांगले. आशिर्वाद देणाऱ्या रुपाचे तसेच बसलेल्या देवतेचे ध्यान केल्यामुळे आपल्याही मनात सुंदर विचार येतात. उग्रदेवतेचे, तसेच शस्त्रधारी देवतेचे ध्यान केल्यामुळे क्रूर आणि हिंस्त्र विचारच डोक्यात थैमान घालतात. गणेशाचे नेहमीचे रुप हे सौम्यच आहे. डेकोरेशनसाठी वेगवेगळी रुपे वापरतात. ती वेगळी.

'हत्ती' हा सर्व प्राण्यांमध्ये बुध्दिमान समजला जातो. आपल्या बारीक डोळ्यांनी आणि नजरेने तो सगळीकडे लक्ष ठेवून परिस्थितीचा अंदाज घेतो. गणेशाची शुंडा Right Vagus Nerve म्हणजे दंत म्हणजेच इडा, पिंगला आणि सुषुम्ना या नाड्यांचा संभार. म्हणजेच जडातून सूक्ष्माकडे जाणाऱ्या ध्यानमार्गाचे ध्यान करणे. पापी लोकांना क्षमा करतो. तसेच वाकड्या तोंडाने बोलणाऱ्यांना आपल्या सोंडेच्या एका फटकाऱ्यात सरळ करतो. तो वक्रदंत एक हात आशिर्वाद देणारा, दुसऱ्या हातातील 'मोदक' अर्थात् 'मुद्' म्हणजे आनंद देणे, दुसऱ्यांना सतत आनंद देणे, हे याचे काम. परशू हे शस्त्र दुष्टांसाठी आणि 'अंकुश' हा मूषकासाठी. उंदारांचा पळपुटेपणा फार असतो. तसेच वेगामध्ये तो चित्त्यालाही मागे टाकतो. कारण मान वळवून उंदीर सगळीकडे पळू शकतो. कुठल्याही वस्तूचे, गोष्टीचे उंदीर कुरतडून कुरतडून तुकडे करुन नष्ट करुन टाकतो. म्हणजेच उंदीर हे 'काळाचे' प्रतीक आहे. त्या मूषकावर अर्थात् त्याच्या पळण्यावर आणि काळावर नियंत्रणाचा 'अंकुश' पाहिजे म्हणून गणेशाच्या हातात 'अंकुश'.

हल्लीचा कॉम्प्युटरचा आकार सुध्दां गणेशासारखाच आहे आणि त्याच्यासाठी असणारा 'माऊस' अर्थात् उंदीर.' गणेशाची भक्ती म्हणजे मूलाधार चक्राची जागा. मूलाधार चक्राचा रंग लाल त्यामुळेच गणेशाला लाल फुले वाहातात. 'दुर्वा' ही वनस्पती थोड्या पाण्यावर सुध्दां जगते व वाढते. दुर्वांच्या एकातून अनेक दुर्वा उगवतात. तसेच पोटातील दाह कमी होण्यसाठी ही दुर्वांचा रस वापरतात.

ज्ञान, शक्ती आणि आनंदाचे केंद्र म्हणजे गणपती हा विशेष नायक म्हणून 'विनायक.' गणांचा, समूहांचा मालक आणि संरक्षक म्हणून 'गणपती'. वर देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा हा ईश्वर म्हणून 'व्रातपति.' वर देणारा म्हणून 'वरद', विघ्नांचा नाश करणारा म्हणून 'विघ्नहर', अशुध्द धान्य स्वच्छ करण्यासाठी आपण सूप वापरतो, म्हणजेच मनातील वाईट विचार नष्ट करुन टाकायचे, त्यासाठी याचे ध्यान करायचे. हा शूर्प (सूप) कर्ण.

अशा ह्या 'अथर्वशीर्षाची महति' कितीही सांगितली तरी कमीच. पुढच्या लेखात त्यातील 'फलश्रुती' बद्दल.

**'थर्व ' म्हणजे चंचल आणि 'अथर्व ' म्हणजे अचंचल अर्थात स्थिर. याशिवाय हे अथर्णव ऋषींनीही लिहिलेले आहे त्यामुळे या स्तोत्रात अतिशय स्थिरता येण्याचे आणि शरीर, मन, बुध्दि यांचा समतोल राखण्याचे सामर्थ्य आहे. कुठल्याही स्तोत्राचा अर्थ समजून ते म्हटले तर त्याचा मनाला जास्त आनंद मिळतो आणि त्याचा परिणाम जास्त होतो. नाहीतर ती नुसतीच पोपटपंची होते. अर्थात् त्याने सुध्दा उपयोग होतोच होते. पण अर्थ समजून म्हणणे म्हणजे सुध्दा साखर. ॐ गं गणपतये नम:। एकदन्ताय विद्महे। वक्रतुंडाय धीमही। तन्नोदंति प्रचोदयात् । हा गणेश गायत्री मंत्र. प्रत्येक देवतेचे गायत्री मंत्र आहेत.**


बायको गेली माहेरी,
काम करी पितांबरी !
घरातील
स्वच्छतेची उत्पादने !
IMPROVED
Extra Thick
Pitambari
Sanit All
Super Power Sanitary Cleaner
5 in 1
Super Active Formula
पितांबरी
Super Improved
Pitambari
Klenz
POWERWASH
THICKER
Pitambari
Dishwash Liquid
For Oily and Stubborn Stains
Rooperi
PITAMBARI
Dishwash Bar
PITAMBARI
Dishwash Jar
पितांबरी जार : कमी विरघळे जास्त चाले !
पितांबरी
होमकेअर डिव्हीजन
पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., ठाणे -२ (०२२) ६७०३ ५५५५, टोल फ्री क्रमांक -१८००२२४४१८.
www.pitambari.com., ASM : राजेश जाधव (मध्य मुंबई)- ९१६७४९२७०६, संतोष देसाई : ९१६७४९२७२०

''प्रिय मित्रं बन्धुता वा समग्रा,
सर्वे कामा: शेवधिर जीवितं वा ।
स्त्रीणां भर्ता भतृदाराश्च पुंसाम्
इत्यन्योनं वत्सयोर् ज्ञातमस्तु ।।''

–कविकुलगुरु कालिदास
(मालविकाग्निमित्रम् – या नाटकातून)

- जीवनात खूप हवीहवीशी वाटणारी एखादी वस्तू,
  (exceedingly longing for)
- जीवनात मिळविण्याजोगे असलेले एकमेव मैत्र,
  (valued friendship)
- जीवनात एकवटून आलेली अशी स्पृहणीय बन्धुता,
  (enriched brotherhood)
- जीवनात प्राप्त करुन घेण्यायोग्य आणि मनामध्ये प्रतिक्षणी उत्पन्न होणाऱ्या नवनवीन कामना.
  (cause for accomplishing )
- जीवनात केवळ मिळविणे हेच ध्येय म्हणून झालेला एकमेव खजिना,
  (only Treasure)
- एवढंच काय...... स्वत:चं अत्यंत अत्यंत प्रियतम असं जीवन,
  (quintessential purpose of very life)
- स्त्रियांना त्यांचा भर्ता असतो. आणि
- पुरुषांना त्यांची पत्नी असते.

(वरील सहाही गोष्टी स्त्रीला तिचा जीवनसाथी व पुरुषाला त्याची अर्धांगिनी असते. एकमेकांनी एकमेकांमध्ये हेच पहायचे.)
तुम्ही दोघांनीही ही गोष्ट जाणून असा बरं!

एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी जीवनात येणारा संबंध, तो हवा–हवासा वाटतो म्हणून, तो मैत्रीभावनेला योग्य वाटला म्हणून, काही नातेसंबंधामुळे जवळचा वाटतो म्हणून, आपल्या काही अपेक्षा त्या व्यक्तीकडून आहेत असे वाटल्यामुळे, ती व्यक्ती प्रसंगी उपयोगी पडू शकणाऱ्या एखाद्या अमूल्य खजिन्यासारखी वाटते म्हणून, आणि हे सर्व वाटणे ज्या आपल्या एका जिवंत असल्याच्या कारणामुळे घडते. 'ते' आपले जिवंत असलेपणाचे फळच जणू...... असे, इतके व एवढे एकमेकांना आपल्या जीवन साथीदाराबद्दल सदैव उमजायला... हवं !!

आपणाला कालिदासाचे हे सांगणे आहे....

अवधूत हर्डीकर, एम.ए. काव्यतीर्थ, IBS(P) १६ ए, गणेशकृपा सोसायटी, परमहंसनगर, पौड रोड,पुणे ३८.

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

## मन

मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करता क्षणी
गुंजी घालतात रोज नवी नवी गाणी ।।

हेंदकाळतच मन झुलते हिंदोळ्यावर
गाणी सरताच समाधान होते चारोळ्यावर ।।

भलतेच लबाड असते नयनांचे रुपडे
नयनांनीच नयनांना करावे मनकवडे ।।

मनाच्या आठवणींना असते नेत्रांची साक्ष
पाऊल पडावे पावलावरी सर्वांचे समक्ष ।।

कोणाही न ठाऊक पडला ठिकाणा मनाचा
धकाधकीच्या काळात नाही भरवसा क्षणाचा ।।

अखेरचे सत्यमात्र एकच असते
शरीरावर नियंत्रण फक्त मनाचेच असते ।।

मनापासून मनाकडे मनाचेसाठी जाणे
हेच असते खरे, आयुष्य सार्थकी लागणे ।।

**वैदेही पळसुले**

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**



**फणसळकर**
**कोंकण काजू**
उत्पादक :
कोकण काजू सांडगी मिरची
फणस–तळलेले गरे काजूकतली
**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**
मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

*With*

*Best Compliments*

*from,*

# Snehal Printers

Commercial Printers


Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,

Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com

Shrikant Sakhalkar 9850130920



कऱ्हाडे ब्राह्मण संघ संस्नेह निमंत्रण पत्रिका,

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर.

३२८ डी, पन्हाळकर बोळ, रंकाळावेस, कोल्हापूर. फोन.:२५४०९७३

**सस्नेह निमंत्रण**

# रौप्यमहोत्सव २०१२-२०१३

सप्रेम नमस्कार,

ज्ञाती बांधवांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी ६ ऑक्टोबर, १९८८ रोजी स्थापन झालेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे ६ ऑक्टोबर, २०१२ ला रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण होत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षाचा शुभारंभ

मा. **श्री. रविंद्र प्रभुदेसाई,** व्यवस्थापकीय संचालक-'पितांबरी'

आणि

प्रख्याते वक्ते **डॉ. सच्चिदानंद शेवडे** (साहित्यिक व व्याख्याते)

यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सोहळ्यात,

**'कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर - २५ वर्षांची वाटचाल - यशोगाथा'**

ग्रंथ प्रकाशन व संघाच्या उन्नतीकरीता योगदान दिलेल्या व्यक्तींचा गौरव उभय मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. या मंगलसमयी आपली आनंददायी उपस्थिती प्रार्थनीय!

| | |
|---|---|
| **सौ. दीपश्री दी. जोशी**<br>कार्यवाह | **सौ. अनुराधा प्र. गुणे**<br>अध्यक्ष |

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर**

| | |
|---|---|
| **डॉ. आरेन हर्डीकर**<br>कार्यवाह | **श्री. रमेश द. दीक्षित**<br>अध्यक्ष |

**रौप्य महोत्सवी समिती**

**कार्यकारिणी आणि महोत्सव समिती सदस्य**

श्रीमती शांता पाध्ये, श्री. आनंद खंडकर, श्री. धर्मराज पंडित, श्री. नितेश जोशी, श्री. दिलीप गुणे, श्री. मधुसूदन जावडेकर, श्री. अजित पराडकर, श्री. विवेक सरदेसाई, श्री. मिलिंद पावनगडकर, ॲड. श्री. माधवराव नानिवडेकर, सौ. शीतल महाजनी, सौ. वंदना गोळवलकर, श्री. अरविंद दीक्षित, डॉ. यशवंत तळवलकर

**समारंभ वेळ** : रविवार दि. ७ ऑक्टोबर, २०१२ सकाळी ९.०० वा.

**समारंभ स्थळ :** राम गणेश गडकरी सभागृह, पेटाळा, खरी कॉर्नर, कोल्हापूर.

**स्वरुची भोजन :** दुपारी १ ते २

**विशेष विनंती :-**

आपल्या संघाच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्य शनिवारी दि. ६ ऑक्टोबर, २०१२ रोजी संघ कार्यालयात ''श्री सत्यनारायण पूजा'' आयोजित केली आहे. तरी तीर्थप्रसादास सकाळी १० ते ११ व सायं. ५ ते ७ या वेळेत आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

सकाळी १० ते ११ व सायं. ५ ते ७ या वेळेत आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

संपर्क : डॉ. आरेन हर्डीकर - ९८२२४३३५००

कार्यक्रम वेळेवर सुरु होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी ही विनंती.

## || संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न** कोल्हापूर : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूरच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण दि.२ सप्टेंबर २०१२ ला करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्र (बॉटनी) विभागातील प्रा. घन:श्याम बलभीम दीक्षित आणि त्यांच्या पत्नी सौ. रमा यांच्या हस्ते विविध परिक्षांमध्ये उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी श्री. दीक्षित म्हणाले, विद्यार्थ्यांनी ज्ञानाची कास कधीच सोडू नये, कारण सध्याचे युग हे ज्ञानयुग असल्यामुळे विद्यार्थ्यांनी ज्ञानराजे होण्याचा प्रयत्न करावा.

यावेळी आदर्श स्त्री, आदर्श दाम्पत्यांनाही गौरविण्यात आले. सौ. सुनिला व श्री. श्रीकांत पित्रे, सौ. आरती व श्री. अरुण दीक्षित, सौ. मालती व श्री. मधुकर सबनीस या आदर्श दाम्पत्यांचा सत्कार करण्यात आला. आदर्श स्त्री म्हणून सौ. चित्रा अजित कशाळकर, आदर्श माता म्हणून श्रीमती सुनिता डोंगरे व मान्यवर पुतोहित नारायण सखाराम निगुडकर यांना गौरविण्यात आले. कोल्हापूरांतील प्रसिध्द वृत्तपत्र व्यावसायिक श्री. अरविंद लुकतुके, श्री. पंचगंगा बँकेचे महाव्यवस्थापक श्री. दीपक फडणीस व सुभाष टाईपरायटिंग इन्स्टिट्यूटचे श्री हृषिकेश पंडित आदि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या बरोबरच सर्वश्री सुधीर मोघे, विनोद धुपकर व अवधूत साधले या आशीर्वचन देणाऱ्या पुरोहितांचा सत्कार झाला. याप्रसंगी संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा प्रकाश गुणे यांनी स्वागत केले व संघाच्या आगामी दि. ७ ऑक्टो., २०१२ रोजी होणाऱ्या रौप्य महोत्सव वर्षाच्या शुभारंभ कार्यक्रमाची माहिती दिली. आमंत्रणाच्या डिजीटल फलकाचे उद्घाटन यावेळी करून आमंत्रण पत्रिका वितरणाची व्यवस्था केली. श्री. मिलिंद पावनगडकर यांनी आभार मानले. कार्यवाह सौ. दीपश्री दी. जोशी यांनी पारितोषिकांच्या देणगीदारांच्या यादीचे वाचन केले.

अध्यक्ष<br>
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर.

---

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे.**

कऱ्हाडे ब्राह्मण संघतर्फे वासंतिक उत्सवाचा कार्यक्रम १९ मे व २०१२ रोज सायं ५ वाजता श्रुति मंगल कार्यालय डेक्कन जिमखाना पुणे येथे साजरा करण्यात आला. ह्या वर्षी महिला उद्योजकांचा संघातर्फे सत्कार करण्यांत आला. त्यामध्ये विविध उद्योगामध्ये कार्यरत १३ महिलांचा सत्कार करण्यांत आला.

ह्या कार्यक्रमानंतर सौ. मानीनी गुर्जर ह्यांनी मिश्र मराठी गीतांचा कार्यक्रम सादर केला. तबला आणि संवादिनीवर त्यांना महिला कालाकारांनी साथ केली. भजन, भावगीत, नाट्यगीत, सीनेगीत आणि अस्सल लावणी त्यांनी सादर केली आणि उपस्थित रसिक सभासदांची मने जिंकली.

सर्व सभासदांसाठी पायपानाची व्ययस्था केली होती. कार्यक्रमाची सांगता सौ. मानिनी गुर्जर ह्यांनी पसायदान गायन करुन केली. नेहमी प्रमाणे अन्नपूर्णा केटरर्स ह्यांच्या स्वादिष्ट भोजनाने झाली. सुमारे ३५० सभासद उपस्थित होते.

दि. १७ जून रोजी संघाचा असंत महत्वाचा कार्यक्रम दरवर्षी साजरा केल जातो. त्यासाठी संघाच्या ४०० पेक्षा अधिक सभासदांना रविवारी सकाळी ९ वाजता जंगली महाराज रोड वरील झाशीच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ आमंत्रित करण्यांत आले होते. झाशी राणीच्या पुर्णाकृती पुतळ्यास संघातर्फे पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले जाते. राष्ट्रसेविका दलातर्फे पुष्पहार अर्पण करण्यांत आला. मा. नगरसेविका सौ. मुक्ता टिळक, सौ. माधुरी सहस्त्रबुध्दे आणि सौ. खाडे उपस्थित होत्या व त्यांनी झाशी राणीच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. संघातर्फे चहापानाचा कार्यक्रम झाल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाल्याचे घोषित करण्यांत आले.

---

**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे** सचिव श्री. गोपाळ भाटवडेकर, ''संपर्क'' त्रैमासिकाचे संपादक श्री. हेमकिरण बाक्रे, आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे च्या विश्वस्त मंडळाचे सदस्य श्री मकरंद फणसळकर हे बेळगांव येथे महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी यांनी आयोजित केलेल्या सभेस उपस्थित होते. ह्या सभेमध्ये बेळगांव, कोल्हापूर, शिरशी, हुबळी आणि परिसरातील अन्य संघाचे सभासद उपस्थित होते. सभेमध्ये कऱ्हाडे ब्राह्मण महासंघातर्फे असे प्रतिपादन करण्यांत आले की प्रत्येक संघाने आपली सदस्य संख वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच ''संपर्क'' त्रैमासिकाचेही सभासद वाढवावेत.

**पहा पान २३ वर....**


**कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त**<br>
**हार्दिक शुभेच्छा !**

**वसुधा एंटरप्रायजेस**

**इंटरिअर डेकोरेटर्स**

**श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८**

**■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.**

**वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...**<br>
**... सर्व सेवा एकाच छताखाली**

## संस्था वृत्त

ह्या सभेमध्ये असाही विचार मांडण्यात आला की सीमा भागातील कऱ्हाडे सभासदांसाठी कानडी भाषेमध्ये काही पाने उपलब्ध करुन दिल्यांस महासंघाच्या या त्रैमासिकासाठी सभासद वाढतील. ह्या सभेचे यशस्वी आयोजनाबद्दल महासंघाने बेळगावच्या श्री चंद्रशेखर जोशींचे अभिनंदन केले.

महासंघातर्फे अशा विभागवार सभा त्या त्या विभागातील मोठ्या शहरामध्ये आयोजित केल्यास महासंघाचा कार्यविस्तार वाढेल. अशी आशा आहे.

**महासंघाचे अधिवेशन**

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे अधिवेशन डिसें.१२ मध्ये करण्याचा विचार आहे. त्याबद्दल प्रत्येक संघास निमंत्रण पाठविण्यांत येईलच. महासंघाचे कार्याबद्दल आपल्या काही सूचना असल्यास त्या संघाने महासंघाचे कार्यालयांत त्वरीत पाठवल्यास विषय सूची मध्ये अंतर्भूत करता येईल.

**कऱ्हाडे ब्राह्मण सेवामंडळ डोंबिवली**

रविवार, २४ जून २०१२ रोजी कांदेनवमी कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात संस्थेच्या हौशी कलाकारांनी आपापल्या कला सादर केल्या.

रविवार १५ जुलै २०१२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता विद्यार्थी गुणगौरव आणि बालक-पालक मेळावा संपन्न झाला. या डॉ. जयंत गोखले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गुणवंतांचा सत्कार व मदतीचे वाटप पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

रक्षाबंधनाच्या दिवशी २ ऑगस्ट २०१२ रोजी श्रावणी या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ८ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठीही ताण-तणाव व अभ्यासाचे नियोजन या विषयावर आरोग्य समितीने व्याख्यान ठेवले होते याच काळात बरस रे मेघा हा पाऊस गाण्यावर आधारित कार्यक्रम संस्थेच्या सभासद कलाकारांनी सादर केला.

अधिक महिन्याचे औचित्य साधून पुरोहित मंडळाने 'पुरुषोत्तम यागाचे' आयोजन रविवार २६ ऑगस्ट रोजी केले होते. याचदिवशी पुण्याचे ह.भ.प. उद्धवबुवा जावडेकर यांचे सुश्राव्य किर्तनही झाले.

**सुहास भागवत**

# दैवीशक्ती

**गणेश गुर्जर, पुणे.**

असे म्हणतात की कोणे एके काळी मानवाकडे दैवीशक्ती होत्या. मानवाने ह्या शक्तींचा दुरुपयोग केला म्हणून सृष्टीकर्त्याला राग आला. आणि मानवाकडील ह्या शक्ती हिरावून घेऊन कुठेतरी लपवायचं त्याने ठरवलं.

त्यानंतर देवानी सभा भरवली. त्यामध्ये चर्चा सुरु झाली. कुणी म्हटलं -''आपण ह्या शक्ती पाताळांत गाडल्या तर कुणालाही कळणार नाही.''

बाह्मदेव म्हणाले, ''उत्सुकतेपोटी हा प्राणी पाताळातसुध्दा जाईल.'' ''समुद्रात ह्या शक्ती बुडवल्या तर?'' कांही देवांच्या मनांत आले. ''नाही- हा चौकस प्राणी कधी ना कधी सागरतळ गाठेलच. आणि आकाशाबद्दलच्या उत्सुकतेबद्दल म्हणाल तर त्याला ती आहे. पहिल्यापासूनच आहे.''

ब्रह्मदेवांच्या ह्या उद्‍गारांनी सर्व देव निराश झाले. ब्रह्मदेव सुध्दा विचारांत पडले.

''ह्या शक्ती आपण मानवातच दडवून ठेवल्या तर? मला वाटते स्वत:मध्ये डोकावून पाहण्याचा विचारही त्याच्या डोक्यांत येणार नाही आणि समजा आलाच तरी तो निश्चितच कंटाळा करेल.''ब्रह्मदेव म्हणाले आणि सर्व देवमंडळींनाही तो पटला तेंव्हा ब्रह्मदेवाने तो त्वरीत अमलांत आणला आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

त्यानंतर मानवाने पृथ्वी पालथी घातली, सागरत गाठला, आकाशांत भरारी घेतली. आणि विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी डोके फोड करु लागला.

पण स्वत:ला मात्र तो शोधू शकला नाही.

With Best Compliments From
Happy Home Services
Consultant for Real Estate
S.S. Naphade
Ph. 25882893
Mobile : 9422302641
Deals in outright Purchase / Rental of Bungalows, Flats, Shops, Plots & Property
Bldg. No. B-3, Flat No. B-6, Chintamaninagar, Anand Park, Aundh, Pune - 411 007.

**|| ॐ ||**
**|| सह नौ अवतु ||**
**|| सह नौ भुनक्तु ||**
**|| सहु वीर्यं करवावहे ||**
**|| तेजस्वि नौ अधीतम् अस्तु ||**
**|| मा विद्‌विषावहे ||**
**|| ॐ शान्तिः, शान्तिः, शान्तिः ||**

- आपण दोघेही, आधिदैविक आपत्तींपासून एकमेकांचे रक्षण करु.
- आपण दोघेही, व्यवहारात उद्‌भवणाऱ्या संकटापासून (प्रसंगी) हातांचा वापर करुनही, एकमेकांचे रक्षण करु!
- जो काही पराक्रम करणे, किर्ति मिळविणे वगैरे असते, ते सर्व आपण दोघेही एकाच वेळी मिळवू!
- या करिता, आपले अध्ययन सदैव लखलखीत, भ्राजमान स्वरुपाचे शुध्दतम असे असो.
- सर्वात् महत्त्वाचे म्हणजे, आपण दोघेही, कधीही एकमेकांचा द्वेष करणार नाही.
- याकरताच, आपल्या आध्यात्मिक जीवनासाठी तसेच व्यावहारिक जीवनासाठीही अति–अति आवश्यक अशी मनाची शान्त–दान्त अशी स्थिती, आपण मिळवू या! ती आवश्यकच आहे.
- प्राचीन काळी भारतात, उपनयनानंतर, गुरुच्या घरी, बारा वर्षे अध्ययन करुन, घरी जाण्यापूर्वी, एक छोटासा सभारंभ होई. त्यावेळी गुरु व शिष्य दोघेही एक शपथ घेत असत.
- ती ही शपथ उपनिषदांमध्ये आरंभी येते.
- त्यातल्या 'भुनक्तु' या शब्दयोजनेमुळे भोजनाच्या आधी म्हणावयाची ही वाक्ये आहेत अशी समजूत अनेकांची झाली असावी.
- कदाचित्, स्मरणात ठेवण्याची आवश्यकता पटल्यामुळे भोजनाच्या आरंभी नेहमीकरिताच ही शपथ उच्चारीत असावेत्, असेही या परंपरेचे समर्थनार्थ म्हणता येईल.
- कसेही असले तरी, गुरु व शिष्य या दोघांप्रमाणे संबंधात येणाऱ्या प्रत्येक दोन व्यक्तींनी एकत्र येऊन अत्यंत गांभीर्याने ही शपथ घेण्याचे कार्य आजही करायला काय हरकत आहे?
- एकमेकांबद्दलची द्वेषभावना, त्याचमुळे होणारी निंदा, घृणा, मत्सर, दुसऱ्याचा तिरस्कार आणि दुसऱ्याविषयी तुच्छताबुध्दी, दुसऱ्याच्या सद्‌गुणांचा द्वेष, आपल्या असुयाबुध्दीची मशागत, दुसऱ्या संबंधींचा मनांत रटरटणारा अनादर आणि एकूणच या सर्वांतून दिसून येणारी आपल्या मनातली वाईट–अमंगल भावना दूर करुन टाकण्यासाठी आमच्या परंपरा तत्पर होत्या असे दिसते. त्यांचे अनुसरण आपण करु या!
- या परंपरा, त्यांतला अर्थ उमजून घेऊन, राखणे, हिणकस मनोभावनांच्या सहवासात आल्यामुळे सुटले असेल, तर त्यांचे पुनरुज्जीवन आपण आपल्याच भल्यासाठी करायला हवेय, हे करणे अशक्य नाहीच नाही !
- कालक्रमानुसार आलेले आपल्यातले सर्व अमंगल, आपल्यातली सर्व घाण, आपल्या मनाची अनेक वर्षे साचलेली बुरशी आपणच दूर करायला हवी. तरच् येणाऱ्या प्रत्येक नवीन क्षणाचा आनंद आपण घेऊ शकू !!
- हे जीवन आनंदासाठी आहे. दुःख वाढविण्यासाठी नाही ! हे आपण आजच समजून घेऊ या !

  परंपरेतल्या उत्तम विचारांच्या प्रसारार्थ....

**श्री अवधूत हर्डीकर, १६ए, गणेशकृपा सोसायटी, परमहंसनगर, पौड रोड, पुणे ४११ ०३८**
**फोन नं. ०२०–२५३८०२०१... यांजकडून**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा वर्धापनदिन साजरा

सातारा– येथील कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा १० वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरासही उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तिंचा तसेच ४ थी ७ वी आणि १० वी १२ वी परीक्षेत उज्ज्वल यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री. हर्षद सरपोतदार होते. या कार्यक्रमानंतर सौ. रुपाली पंडित जोगळेकर यांचा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. कोरेगांव ब्राह्मण संघाचा पहिला मेळावा नुकताच येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. पद्माकर पाठकजी हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याचवेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विजय कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर सुरेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात वर्षभरातील कार्यक्रमाची माहिती सांगितली.